## विभागामार्फत राबवीण्यात येणाऱ्या लोकाभिमुख योजनांची माहिती

अ) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजना राबवीणे:- महाराष्ट्रामध्ये शेतीला उत्तम जोडव्यवसाय म्हणुन पशुपालनाकडे पाहीले जाते. कितीही अडचणी आल्यातरी शेतकरी पशुधन वाऱ्यावर सोडत नाही. कारण जनावर आजारी पडल्यास त्यावा परिणाम थेट दुग्धोत्पदनावर होतो. चांगल्या दुग्धोत्पदनासाठी जनावरांचे आरोग्य चांगले राहणे आवश्यक आहे. यासाठी पशुपालकांना जनावराचे लसीकरण, जंतनिर्मूलन , जनावरांमधील वंध्यत्वाचे व्यवस्थापन, गोचिड निर्मूलन, दुग्धस्पर्धेचे आयोजन, निकृष्ठ चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिके व सांसर्गीक रोगाची माहिती इत्यादी विषयाचे ज्ञान असण्या करीता कामधेनु दत्तक ग्राम योजना राबवीण्यात येत आहे. निवडीचे निकष:- कामधेनु दत्तक ग्राम योजनेची निवड ही ज्या गावामध्ये 300 किंवा त्यापेक्षा अधिक दुधाळ जनावरे आहेत अशा गावाची किंवा 300 जनावरे नसल्यास नजिकचे गाव मिळुन एका गावाची निवड करण्यात येते.

1) योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत :- या योजने अंतर्गत 1) पशुपालक मंडळ स्थापन करणे सहलीचे आयोजन करणे 7000/- 2) जंतनाशक शिबीरे 17500/- 3) खनिजद्रव्ये मिश्रण व जिवनसत्व पुरवठा 40000/- 4) गोचिड गोमाशा निर्मूलन 13000/- 5) वंध्यत्व निवारण शिबीरे औषधोपचार 22000/- 6) वैरण विकास कार्यक्रम 17000/- 7) निकृष्ठ चारा सकस करणे 5000/- 8) प्रसिध्दी व प्रचार 21000/- 9) नविन्यपुर्ण उपक्रम राबवीणे 5000/- 10) जनावराचे मलमुत्र व वाया गेलेल्या चाऱ्याचे खत व्यवस्थापन प्रशिक्षण 5000/- असे एका गावाकरीता एकुण रु.152500/- प्रमाणे निवड केलेल्या गावामध्ये वरील प्रमाणे विविध कार्यक्रम राबवीण्यात येतात.
2) अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

ब) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत एकात्मीक कुक्कुट विकास कार्यक्रम राबवीणे:- Low input Technology Birds जसे गिरीराज, वनराज, सुवर्णधारा, कडकनाथ, कॅरीगोल्ड, आर.आय.आर. ब्लॅक ऑस्ट्रॅलॉर्प या पक्षांना स्थानिक स्तरावर गावठी कोंबडयाप्रमाणेच मांसासाठी तसेच अंडयासाठी प्रचंड मागणी असुन शासनाकडे असलेल्या सद्यापरिस्थीती मधील अपुऱ्या पायाभुत सुविधामुळे सदरील मागणीची पुर्तता करणे शक्य होत नाही. या करीता एकात्मीक कुक्कुट विकास कार्यक्रमा अंतर्गत तलंग, एक दिवसीय कोंबडीची पिल्ले वाटप ही योजना राबवीण्यात येते.

निवडीचे निकष:- या कार्यक्रमा अतंर्गत सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना 50 टक्के अनुदानावर एका कुटूंबातील एकाच व्यक्तिस या योजनेचा लाभ देता येतो. दारिद्र रेषेखालील लाभार्थी, भुमीहीन शेतमजुर, मागासवर्गीय व अल्प,अत्यल्पभुधारक लाभार्थ्यांना तसेच 30 टक्के महीला व 3 टक्के विकलांग लाभार्थ्याना प्रथम प्राधान्य देण्यात येते.

योजने अतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत:- या योजने अंतर्गत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यास 50 टक्केअनुदानावर एक दिवसीय कोंबडीची पिल्लांचा (100 पिल्ले = 1 गट) या प्रमाणे पक्षी वाटप करण्यात येतात.








अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

क) जिल्हा वार्षिक योजने अतर्गत दुभत्या जनावरांच्या खाद्य उपलब्धतेमध्ये सुधारण करणे(वैरण विकास योजना ) :- पशुपालकाकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढवीणे व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त दुध उत्पादनासाठी पशुपालकाकडे

असलेल्या जनावरांना 12 महीने हिरवा चारा मिळण्याचे अनुषंगाने वैरणीचे उत्पादनाकरीता विभागा मार्फत 100 टक्के अनुदानावर हिरव्या वैरणीचे बियाणे वाटप करण्यात येतात.

निवडीचे निकष:- ज्या पशुपालकाकडे जास्तीत जास्त दुधाळ जनावरे आहेत. व त्यांच्याकडे ओलीताची सोय उपलब्ध आहे अशा लाभार्थ्यास 100 टक्के अनुदानावर हिरव्या वैरणीचे बियाणे करीता लाभार्थ्याची निवड करण्यात येते.

योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत:- या योजने अंतर्गत एका लाभार्थ्यास रु. 600/- च्या मर्यादेपर्यंत वैरणीचे बियाणे किंवा गवताची थोंबे वाटप करण्यात येतात.

अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

ड) विशेष घटक योजने अंतर्गत व  ओटीएसपी योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे/शेळी गटाचे वाटप करणे :- अनुजाती व नवबौध्द तसेच अनुसुचित जमातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराव्दारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदरहु योजने अंतर्गत दुधाळ जनावरे/शेळी गटाचे वाटप करण्यात येते.

निवडीचे निकष:- या योजने अंतर्गत लाभार्थीची निवड ही पुढील प्रमाणे प्राधान्य क्रमानुसार करण्यात येते, दारिद्र रेषेखालील , अत्यल्प भुधारक, अल्पभुधारक, सुशिक्षीत बेरोजगार, महीला बचत गटाचा लाभार्थी. लाभार्थ्याकडे जातीचा दाखला असावा. 1 मे 2001 नंतर तिसरे अपत्य नसावे. कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.

योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत:- 02 संकरीत गाई/म्हशींचा गट प्रति गाय/म्हैस रु. 40000/- किमती प्रमाणे रु. 80000/- व 5.75 टक्के अधिक 10.03 टक्के सेवादर या दराने तिन वर्षाचा विमा रु. 5061/- असे एकुण 85061/- प्रमाणे एक गट देण्यात येतो. यापैकी शासकीय अनुदान रु. 63796/- व 5 टक्के लाभार्थी हिस्सा व 20 टक्के बँकेचे अर्थसहाय्य असे आहे.

10+1 शेळी गटा करीता:- शेळया खरेदी रु. 40000/- बोकड खरेदी रु. 5000/- शेळया व बोकडाचा विमा रु. 2848/- असे एकुण रु. 47848/- प्रमाणे गट देण्यात येतो. यापैकी शासकीय अनुदान 35886/-अनुज्ञेय आहे.




अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

ई) विशेष घटक योजने अंतर्गत दुधाळ जनावरांना पशुखाद्य वाटप करणे:- अनु जातीव नवबौध्द लाभाथ्याकडे असलेल्या पशुपालकाकडे असलेल्या पशुधनाची उत्पादकता वाढवीणे व त्या अनुषंगाने जास्तीत जास्त दुध उत्पादनासाठी पशुपालकाकडे असलेल्या जनावरांना पशुखाद्य वाटप करण्यात येते.

निवडीचे निकष:- अनु.जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना विशेष घटक योजने अंतर्गत किंवा ईतर योजने अंतर्गत दुधाळ जनावरे वाटप केलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल. लाभार्थ्याकडे दुधाळ जनावरे असावेत. लाभार्थी निवडतांना 30 टक्के महीला व 3 टक्के विकलांक यांना प्राधान्य आहे.

योजना अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत:- सदरहु योजने अंतर्गत अनु. जाती/नवबौध्द यांना शासकीय योजनेव्दारे पुरवठा केलेल्या जनावरांना किंवा लाभार्थ्याकडे असलेल्या स्वत:च्या दुधाळ जनावरांना भाकड कालावधीसाठी म्हशी करीता 225 किलो व गायी करीता 150 किला पशुखाद्य100 टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येते.  पशुखाद्य वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यास करावा लागतो.

अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

फ) विशेष घटक योजने अंतर्गत अनु. जाती/नवबौध्दांना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणे:- अनु. जाती/नवबौध्द लाभार्थ्यांना पशुपालनाची आवड निर्माण व्हावी तसेच पशुपालनासंबंधी अत्याधुनिक ज्ञान मिळावे या दृष्टीने पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते.

निवडीचे निकष:- लाभार्थी अनु. जाती/नवबौध्द या जातीचा असावा.

योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या लाभा बाबत :- या योजने अंतर्गत एका लाभार्थ्यावर रु. 1000/- खर्च करण्यात येतो यामध्ये जाण्यायेण्याचा खर्च, पशुसंवर्धन विषयक माहिती पुस्तीका, चहा , नास्ता, लेखन सामुग्री याचा समावेश आहे.

अर्जाचो नमुने:- अर्जाचे नमुने तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि) पंचायत समिती या कार्यालयात उपलब्ध आहेत.

ग) पशुसंवर्धन विभागाच्या ईतर नाविण्यपुर्ण योजना :-जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन बुलडाणा जिल्हा बुलडाणा या कार्यालयामार्फत नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत एका लाभार्थ्यास सहा गायी/म्हशीचा एक गट वाटप करणे, अशंत: ठाणबध्द पध्दतीने 10 शेळया व 1 बोकड याचे गट मंजुर करणे, कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पालन व्यवसाय करीता कुक्कुट पक्षांचे गट वाटप करणे राष्ट्रीय कृषी विस्तार योजने अंतर्गत 40+2 चा शेळी गट 50 टक्के अनुदानावर वाटप करणे वगैरे योजना राबवील्या जातात.

ह) रोग प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम:- राज्यामध्ये आर्थीकदृष्टया महत्वाचे रोगापासुन संरक्षण करणे व रोगमुक्त पट्टा निर्माण करणे करीता आर्थिकदृष्टया महत्वाचे रोगावर घटसर्प, फऱ्या, राणीखेत लसीकरण करण्यात येते, पल्स पोलीओ च्या धर्तीवर लाळया खुरकुत रोगप्रतिबंधक पट्टा निर्माण करणे अंतर्गत 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत लाळ खुरकुत लस टोचणी करण्यात येते.